पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रीय कार्यालय निगडी, पुणे-44
जा.क्र.अक्षेका/11/कावि/1225 /2017
दिनांक 8 /9/2017

प्रति,

मा.श्री./श्रीम. -------------------------------
सदस्य/सदस्या अ प्रभाग समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी- 44

विषयः- अ प्रभाग समितीची **माहे सप्टेंबर 2017 ची मासिक** सभा दि. **12/9/2017** रोजी सकाळी **11.00** वा. आयोजित केलेबाबत.. .

**मा. महोदय / महोदया,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची **माहे सप्टेंबर 2017 ची मासिक** सभा मंगळवार दिनांक 12/9/2017 रोजी सकाळी 11.00 वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे आयोजित केली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. प्रस्तुत सभेस कृपया आपण उपस्थित रहावे, हि विनंती.

**आपली विश्वासू,**

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती

**कृ.पा.म.**

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 18

## अ प्रभाग समिती

### कार्यपत्रिका क्रमांक 3

**दिनांक :- 12/9/2017** **वेळ: सकाळी 11.00 वाजता**

.................................................................................................................

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दि. 12/9/2017 रोजी सकाळी 11.00 वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे आयोजित केली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

मागील विशेष सभेचा सभावृत्तांत वाचून [ दि. 29/8/2017 चा ] कायम करणे.

| | |
|---|---|
| विषय क्रमांक 1 | मा. सभापती, अ प्रभाग समिती यांचा दि. 22/8/2017 रोजीचा प्रस्ताव<br>प्रभाग क्रमांक 10 येथील शाहूनगरमधील कै. सदाशिव बहिरवाडे क्रिडांगण व व्यायामशाळेचे **राजर्षी शाहू महाराज क्रिडांगण व व्यायामशाळा** असे नामकरण करणेस मान्यता देणे.<br>[ दि 29/8/2017 रोजीच्या विशेष सभेमधील निणर्यानुसार ] |
| विषय क्रमांक 2 | सन्मा. सदस्या / उपमहापौर शैलजा अविनाश मोरे यांचा दि. 22/5/2017 चा प्रस्ताव<br>मनपाच्या हद्दीत निगडी, प्राधिकरण येथील चौकास **संभाजी चौक** असे नाव देण्यात आले असून त्या नावात दुरुस्ती करुन **छत्रपती श्री संभाजी महाराज चौक** असे नांव देणेस मान्यता देणे. |
| विषय क्रमांक 3 | मा. सह शहर अभियंता [ BRTS ] यांचेकडील पत्र क्रमांक स्था/बीआरटीएस/ 289/2017 दि. 29/6/2017<br>स्थापत्य बीआरटीएस विभागामार्फत एम्पायर इस्टेट चिंचवड येथे उड्डानपुलाचे काम पुर्णत्वाचे मार्गावर आहे. सदर उड्डान पुलास अ प्रभाग समितीमध्ये ठराव क्रमांक 52 विषय क्रमांक 4 दि. 14/9/2016 नुसार **सेंट मदर टेरेसा** असे नामकरण करण्याचा सदस्य् ठराव पारीत झाला आहे. सदरचा ठराव सदस्य ठराव असल्याने त्याची अंमलबजावणी करणेकामी तत्कालीन मा. आयुक्त यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर ठरावाची अंमलबजावणी करणेकामी मा. आयुक्त यांनी दि. 16/12/2016 रोजी मान्यता दिली आहे.<br>तथापि, सन्मा. सदस्या जयश्री वसंत गावडे यांनी दि. 2/6/2017 रोजीचे पत्रान्वये सदर उड्डानपुलास **पंडीत दिनदयाल उपाध्याय** असे नामकरण करणेकामी मा. महापौर सो. यांचेकडे कळविले आहे. तसेच मा. योगेश मंगलसेन बहल, विरोधी |

| | |
|---|---|
| | पक्षनेता यांनी सदर पुलास **सेंट मदर टेरेसा उड्डानपुल** असे नामकरण करणेस यापुर्वीच मान्यता दिली असलेने तेच कायम ठेवणेबाबत मा. महापौर सो. यांचेकडे कळविले आहे.<br>सदर नामकरणाचा ठराव करणे अथवा दुरुस्ती करणेचा अधिकार प्रभाग समितीस आहे. त्यामुळे चिंचवड येथील एम्पायर इस्टेट सोसायटी जवळील उड्डानपुलाचे नामकरणाबाबत अंतिम निर्णय घेणेकामी अ प्रभाग समितीचे अवलोकनार्थ ठेवणेकामी संदर्भिय पत्रान्वये कळविले आहे . |
| विषय क्रमांक 4 | सन्मा. सदस्या कोमल दिपक मेवानी यांचा दि. 28/8/2017 चा प्रस्ताव<br>प्रभाग क्रमांक 19 मधील सॅनिटरी चाळ येथील जुने संडास ब्लॉक पाडून नवीन बांधणेकामी मान्यता देणे. |
| विषय क्रमांक 5 | सन्मा. सदस्या कोमल दिपक मेवानी यांचा दि. 28/8/2017 चा प्रस्ताव<br>प्रभाग क्रमांक 19 मधील 8/9 येथील जुने संडास पाडून बालवाडी व ज्येष्ठ नागरीकांना विरंगुळा केंद्र बांधणेस मान्यता देणे. |
| विषय क्रमांक 6 | सन्मा. सदस्या कोमल दिपक मेवानी यांचा दि. 28/8/2017 चा प्रस्ताव<br>प्रभाग क्रमांक 19 मधील बी ब्लॉक 30/31 येथील कचराकुंडी काढून त्या ठिकाणी वाचनालय बांधणेस मान्यता देणे. |
| विषय क्रमांक 7 | सन्मा. सदस्या कोमल दिपक मेवानी यांचा दि. 28/8/2017 चा प्रस्ताव<br>प्रभाग क्रमांक 19 मधील ख्रिश्चन दफनभूमी कमान करणेस मान्यता देणे. |
| विषय क्रमांक 8 | सन्मा. सदस्या कोमल दिपक मेवानी यांचा दि. 28/8/2017 चा प्रस्ताव<br>प्रभाग क्रमांक 19 मधील भाटनगर बिल्डींग क्रमांक 1 ते 17 सर्व बिल्डींगची दुरुस्ती व वॉटर प्रुफींग करणे, टाक्या बांधणेकामी मान्यता देणे. |
| विषय क्रमांक 9 | सन्मा. सदस्या कोमल दिपक मेवानी यांचा दि. 28/8/2017 चा प्रस्ताव<br>प्रभाग क्रमांक 19 मधील सॅनिटरी चाळ, भिमनगर परिसरात दुरुस्ती करणेस मान्यता देणे. |
| विषय क्रमांक 10 | सन्मा. सदस्या कोमल दिपक मेवानी यांचा दि. 28/8/2017 चा प्रस्ताव<br>प्रभाग क्रमांक 19 मधील आंबेडकर कॉलनी, बौध्दनगर, एम.आय.डी.सी. परिसर, भाटनगर, रमाबाई नगर, पत्राशेड लिंकरोड. निराधारनगर, सोनिया गांधीनगर या सर्व झोपडपट्टी परिसरात दुरुस्ती करणेस मान्यता देणे. |

| | |
|---|---|
| विषय क्रमांक 11 | सन्मा. सदस्या कोमल दिपक मेवानी यांचा दि. 28/8/2017 चा प्रस्ताव<br>प्रभाग क्रमांक 19 मधील वरील सर्व परिसरात [ आंबेडकर कॉलनी, बौध्दनगर, एम.आय.डी.सी. परिसर, भाटनगर, रमाबाई नगर, पत्राशेड लिंकरोड. निराधारनगर, सोनिया गांधीनगर ] आवश्यक त्या ठिकाणी नवीन शौचालय बांधणेस मान्यता देणे. |
| विषय क्रमांक 12 | सन्मा. सदस्या कोमल दिपक मेवानी यांचा दि. 28/8/2017 चा प्रस्ताव<br>प्रभाग क्रमांक 19 मधील बालवाडी, अंगणवाडी करीता या परिसरात कार्यालय बांधून देणेस मान्यता देणे. |
| विषय क्रमांक 13 | सन्मा. सदस्या कोमल दिपक मेवानी यांचा दि. 28/8/2017 चा प्रस्ताव<br>प्रभाग क्रमांक 19 मधील नदीलगतचा भाग आंबेडकर कॉलनी, बौध्दनगर, एमआयडीसी परिसर, पत्राशेड लिंकरोड, स्मशानभूमी परिसरापासून आंबेडकर कॉलनीपर्यंत सिमा भिंत बांधणेस इतर बांधकाम करणेस मान्यता देणे. |
| विषय क्रमांक 14 | सन्मा. सदस्या कोमल दिपक मेवानी यांचा दि. 28/8/2017 चा प्रस्ताव<br>प्रभाग क्रमांक 19 आंबेडकर कॉलनी समाज मंदीर बांधणेस [ आंबेडकर सांस्कृतिक भवन ] मान्यता देणे. |
| विषय क्रमांक 15 | सन्मा. सदस्या कोमल दिपक मेवानी यांचा दि. 28/8/2017 चा प्रस्ताव<br>प्रभाग क्रमांक 19 मधील बी ब्लॉक 1 ते 31, मेन बाजार पेठ मध्ये हॅगिंग लिटरबीन बसविण्यास मान्यता देणे. |
| विषय क्रमांक 16 | **सन्मा. सदस्य राजू मिसाळ यांचा प्रस्ताव दि / /2017**<br>दरवर्षी डिसेंबर महिन्यात महाराष्ट्र अथलॅटिक असोसि एशनच्या मान्यतेनुसार रोटरी क्लब ऑफ निगडी मार्फत प्राधिकरण क्षेत्रात हाफ मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असते. त्याकरीता से.क्र. 27 अ येथील संत तुकाराम उदयानाशेजारील महापौर निवासाच्या आरक्षित मोकळया भूखंडावर मंडप व स्टेज टाकून कार्यक्रमाचे नियोजन केले जाते. यंदाच्या वर्षी देखील सदरचा कार्यक्रम दि. 14/12/2017 ते 17/12/2017 या कालावधीत होणार असून सदर कार्यक्रमाकरीता सदरचा भुखंड भाडेतत्वावर रोटरी क्लब ऑफ निगडी यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.<br>तरी सदरचा भुखंड या कालावधीत इतर कोणालाही दिला असल्यास पी परवानगी रद्द करुन रोटरी क्लब ऑफ निगडी यांना देण्यास मान्यता देणे. |

| | |
|---|---|
| विषय क्रमांक 17 | मा. सभापती, अ प्रभाग समिती यांचा दि. 7/9/2017 रोजीचा प्रस्ताव<br>अ क्षेत्रीय कार्यालय सन 2017-18 **करीता** तरतुद केलेल्या बजेटची माहिती देणे व चर्चा करणे तसेच सदय:स्थितीबाबत माहिती देणे**स** मान्यता देणे. |
| विषय क्रमांक 18 | मा. सभापती, अ प्रभाग समिती यांचा दि. 7/9/2017 रोजीचा प्रस्ताव<br>म्हाडा मोरवाडी परिसरात हातगाडी पथारीवाले यांचे संदर्भात धोरण निश्चित करणे**स** मान्यता देणे. |
| विषय क्रमांक 19 | मा. सभापती, अ प्रभाग समिती यांचा दि. 7/9/2017 रोजीचा प्रस्ताव<br>म्हाडा मोरवाडी या भागात पदपथाचे काम करणे**स मान्यता देणे.** |
| विषय क्रमांक 20 | मा. सभापती, अ प्रभाग समिती यांचा दि. 7/9/2017 रोजीचा प्रस्ताव<br>म्हाडा मोरवाडी या परिसरातील विदयुत खांब बसविणे**स मान्यता देणे**. |
| विषय क्रमांक 21 | मा. सभापती, अ प्रभाग समिती यांचा दि. 7/9/2017 रोजीचा प्रस्ताव<br>संत ज्ञानेश्वर क्रिडा संकुल मोरवाडी येथे सिमाभिंत बांधणे**स** व वॉकींग ट्रॅकची दुरुस्ती करणे**स मान्यता देणे.** |
| विषय क्रमांक 22 | मा. सभापती, अ प्रभाग समिती यांचा दि. 7/9/2017 रोजीचा प्रस्ताव<br>कापसे उदयानातील हॉलची दुरुस्ती करणे व उदयानात बेंचेस बसविणे. |
| विषय क्रमांक 23 | मा. सभापती, अ प्रभाग समिती यांचा दि. 7/9/2017 रोजीचा प्रस्ताव<br>बँक ऑफ महाराष्ट्र पिंपरी चौक येथे बस थांबा करणे**स मान्यता देणे.** |
| विषय क्रमांक 24 | मा. क्षेत्रीय अधिकारी, अ क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील पत्र क्रमांक अक्षेका/आ/2/ कावि / 542/2017 दि. 8/9/2017<br>अ क्षेत्रीय कार्यालय आरोग्य विभागाचे सन 2017-18 चे मूळ अंदाजपत्रकामध्ये **वाहन इंधन खर्च** या लेखाशिर्षावर र.रु. 27,00,000/- इतकी तरतूद उपलब्ध आहे. या मधून अ क्षेत्रीय कार्यालय आरोग्य विभागाकडील मनपाचे वाहनांमध्ये दैनंदिन कचरा वाहतुक कामकाजासाठी आवश्यक डिझेल खरेदीसाठी खर्च करणेत येतो. माहे जुलै 2017 अखेर यापैकी र.रु. 25,99,174/- इतका खर्च झालेला असून र.रु. 1,00,826/- इतकी तरतूद शिल्लक आहे. माहे ऑगस्ट 2017 ते फेब्रुवारी 2018 अखेर या कालावधीसाठी प्रत्यक्ष येणारा खर्च विचारात घेता र.रु. 25,00,000/- इतकी तरतूद कमी पडणार आहे. यासाठी अ क्षेत्रीय कार्यालय आरोग्य विभागाकडील सन 2017-18 चे मूळ अंदाजपत्रकातील **कचरा उचलणे व हलविणे खर्च** या लेखाशिर्षावरील र.रु. 40,00,000/- मधून 25,00,000/- इतकी तरतूद |

| | |
|---|---|
| | **वाहन इंधन खर्च** या लेखाशिर्षावर वर्ग करणे आवश्यक आहे. सदरचे अंतर्गत तरतूद वर्गीकरणास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 103 व अनुसुची प्रकरण 7 [ 2 ] मधील तरतूदीनुसार मान्यता देणे. |

सही/-

**प्रशासन अधिकारी तथा**
**सचिव (सभाशाखा)**
**अ प्रभाग समिती**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी- 44
क्रमांक अक्षेका/11 /कावि /1225 /2017
दि.  8 / 9/2017